# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक:-ग्रापनि-२००७/प्र.क्र.३४/का.८,
नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- १६/११/२००७

## आदेश

ज्याअर्थी, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ व त्या अंतर्गत मुंबई ग्रामपंचायत (सद संख्या, प्रभागांचे विभाजन करणे व जागा राखून ठेवणे) नियम, १९६६ व मुंबई ग्रामपंचा निवडणूक नियम, १९५९ या अंतर्गत ग्रामपंचायत निवडणुकीबाबत प्रभाग रचना करणे, आरक्ष ठरविणे तसेच निवडणूक नियमांतर्गत निवडणुकीबाबत आवश्यक ती कार्यवाही करणे याबाब अधिकार भारतीय संविधानाचे कलम २४३ के अंतर्गत प्राप्त अधिकारांचा व मुंबई ग्रामपंचा अधिनियम, १९५८ चे कलम १० अ च्या तरतुदीनुसार प्राप्त अधिकारांचा वापर करुन रा निवडणूक आयोगाचे आदेश दि. २७ जानेवारी, १९९५ अन्वये सदर आदेशात नमूद केल्याप्रम संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांना तर काही विशेष अधिकार तहसिलदार यांना प्र करण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, असे असले तरी दि. २२ जुलै, १९८६ च्या महसूल व वन विभागाक शासन निर्णय क्र.पीडब्ल्यूआर ४९८४/७५२८९ (१०३)/ल-२ नुसार राज्यातील सर्व जिल्हयात अपर जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या संबंधित अधिकारितेत जिल्हाधिका-यांच्या शक्तींचे प्रत्यायो करण्याची अधिसूचना निर्गमित करण्याचा निर्णय घेतला आहे आणि त्यास अनुसरुन दिनांक जुलै, १९८६ च्या अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग, महाराष्ट्र जमीन मह संहिता, १९६६ चे कलम १३(३) अंतर्गत सर्व जिल्हयांचे अपर जिल्हाधिकारी हे त्यांच्या संबं कार्यक्षेत्रात जिल्हाधिका-यांचे अधिकार वापरतील व कर्तव्ये पार पाडतील असे आदेश निर्ग केले आहेत.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाकडील शासन नि परिपत्रक क्र.एस-१४/३६१३/प्र.क्र.२०९(२)/ई-३, दि. ३० एप्रिल, १९९२ अन्वये जिल्हाधिका अपर जिल्हाधिकारी यांच्यामध्ये कामाची वाटणी त्या परिपत्रकाच्या सोबतच्या प्रपत्र अ व प्रप मध्ये दर्शविल्यानुसार करण्यात आलेली आहे. सदर परिपत्रकाच्या प्रपत्र ब मध्ये क्रमांक १ "मुंबई ग्रामपंचायत अधिनियमाखालील निवडणुकांसह ग्रामपंचायतविषयक सर्व बाबी" असे

F:\VillagePanchayats\gporder.doc

करुन ग्रामपंचायत निवडणुका व आनुषंगिक बाबी अपर जिल्हाधिकारी यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या आहेत.

आणि ज्याअर्थी, अपर जिल्हाधिकारी हे त्यांच्याकडील कामाच्या स्वरुपामुळे ग्रामपंचायत निवडणुकांच्या कामास आवश्यक न्याय देऊ शकत नाहीत. आणि त्यामुळे काही त्रुटी राहून जातात. तसेच काही बाबींकडे दुर्लक्ष होते असे आढळते. ही बाब काही ठराविक जिल्हयांमध्ये विशेष करुन आढळून आलेली आहे. या संबंधात मा. उच्च न्यायालयात दाखल झालेल्या दोन रिट याचिकांमध्ये मा. उच्च न्यायालयाने सुनावणीदरम्यान असे मत व्यक्त केले की, ग्रामपंचायत अधिनियम व संबंधित नियम यांच्या तरतुदीमध्ये राज्य निवडणूक आयुक्त किंवा प्राधिकृत अधिकारी असा उल्लेख असताना व राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश दिनांक २७ जानेवारी, १९९५ नुसार या शक्ती व कर्तव्ये पार पाडण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान केले असताना जिल्हाधिका-यांऐवजी राज्य शासनाकडील कामाच्या वाटपानुसार अपर जिल्हाधिकारी सदर कर्तव्ये पार पाडतात / अधिकारांचा वापर करतात हे योग्य दिसत नाही.

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाचे दिनांक २७ जानेवारी, १९९५ च्या आदेशानुसार त्या आदेशात नमूद केलेले अधिकार व कर्तव्ये निवडणुका स्वच्छ, निर्भय व मुक्त वातावरणात नि:पक्षपातीपणे पार पाडण्याच्यादृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्याकरिता जिल्हाधिकारी यांचेकडे सोपविण्यात आले आहेत. मात्र शासनाकडील दि. २२ जुलै, १९८६ चा शासन निर्णय व अधिसूचना तसेच दि. ३० एप्रिल, १९९२ चे परिपत्रक यामुळे ग्रामपंचायत निवडणुका हा विषय अपर जिल्हाधिकारी हे हाताळत असल्यामुळे ग्रामपंचायत निवडणुकांच्या बाबतीत आयोगाच्या आदेशाची परिणामकारक अंमलबजावणी करण्यामध्ये काही ठराविक जिल्हयांमध्ये अडचणी निर्माण होतात. किंबहुना राज्य निवडणूक आयोगाला प्राप्त असलेल्या सांविधानिक अधिकारांन्वये निर्गमित केलेल्या दि. २७ जानेवारी, १९९५ च्या आदेशात काही बदल अपेक्षित नाही आणि राज्य निवडणूक आयोगाचे आदेश दि. २७ जानेवारी, १९९५ चे असल्यामुळे राज्य शासनाचे दि. २२ जुलै, १९८६ आणि दि. ३० एप्रिल, १९९२ चे आदेश निष्प्रभ ठरतात. त्याचप्रमाणे ग्रामपंचायत निवडणुकांच्या संदर्भात मा. उच्च न्यायालयात वा इतर न्यायालयांमध्ये दाखल होणा-या न्यायालयीन प्रकरणात अशा विसंगतीमुळे कायदेशीर अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आयोगाच्या दि. २७ जानेवारी, १९९५ च्या आदेशात नमूद केल्याप्रमाणे जिल्हाधिकारी किंवा यथास्थिती तहसिलदार यांनीच ग्रामपंचायत निवडणुकांच्या संदर्भातील अधिकार व कर्तव्ये पार पाडावीत असे आदेश नव्याने स्पष्ट करणे आवश्यक झाले आहे.

आणि ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के अंतर्गत आणि मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम १० अ (४) मधील तरतुदीनुसार प्राप्त अधिकारांचा वापर करुन मुक्त व निर्भय वातावरणात निवडणुका पार पाडण्याच्या दृष्टीने अधिनियमाच्या तरतुदीशी

विसंगत नाहीत असे सर्वसाधारण अथवा विशेष आदेश / निदेश देण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाला आहेत.

आणि त्याअर्थी, मी नन्द लाल, राज्य निवडणूक आयुक्त भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के अंतर्गत आणि मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम १० अ (४) च्या तरतुदीनुसार प्राप्त अधिकारांचा वापर करुन असे आदेश देत आहे की, आयोगाचे दिनांक २७ जानेवारी, १९९५ च्या आदेशात नमूद केल्याप्रमाणे मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ व त्या अंतर्गत मुंबई ग्रामपंचायत (सदस्य संख्या, प्रभागांचे विभाजन करणे व जागा राखून ठेवणे) नियम, १९६६ व मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम, १९५९ मधील संबंधित तरतुदींअंतर्गत अधिकार व कर्तव्ये हे संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी पार पाडतील. तसेच दिनांक २७ जानेवारी, १९९५ च्या आदेशात ज्या ठिकाणी जे अधिकार व कर्तव्ये पार पाडण्याचे प्राधिकार संबंधित तालुक्याच्या तहसिलदारांना देण्यात आले आहेत, ते अधिकार व कर्तव्ये संबंधित तालुक्याचे तहसिलदार पार पाडतील. त्याचप्रमाणे ग्रामपंचायत निवडणुका व आनुषंगिक बाबी उदा. प्रभाग रचना, आरक्षण व प्रत्यक्ष निवडणुकांबाबत सर्व कार्यवाही ही जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी व तालुका स्तरावर संबंधित तालुक्याचे तहसिलदार यांचे नियंत्रणाखाली पार पाडली जाईल.

या आदेशाद्वारे दि. २७ जानेवारी, १९९५ च्या आदेशावर पुन्हा भर देण्यात येत आहे. तसेच या दोन्ही आदेशांचे त्वरित व अचूक पालन होणे अत्यंत आवश्यक आहे. वरील आदेश या आदेशाच्या दिनांकानंतर होणा-या सर्व ग्रामपंचायत निवडणुकांपासून अंमलात येतील.

( नन्द लाल )
राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र

F:\VillagePanchayats\gporder.doc